# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र-०९** **दिनांक - ०९/०१/२०२४**

## तडीपर इसमास मध्यवर्ती गुन्हे शाखेकडुन अटक

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्ताल परिसरातुन तडीपार केलेल्या इसम मिळुन येताच कारवाई करणे बाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

त्याअनुषंगाने मा.पोलीस उप आयुक्त गुन्हे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी सुचना व मार्गदर्शना प्रमाणे मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार असे दिनांक ०५/०१/२०२४ रोजी खाजगी वाहनातून झोन-१ मध्ये तडीपार इसम शोध घेणे कामी गस्त फिरत असतांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, तडीपार इसम नामे सुदर्शन खंदारे हा त्याचे चाळी समोर रस्त्यावर येणार आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाले वरुन आम्ही तात्काळ सदर ठिकाणी बातमीदारसह जावून सुदर्शन बिबिशन खंदारे, वय-३२, रा. रुम नं ५३२, साई चाळ, आदर्श इंदिरा नगर, गल्ली क्र. १०, भाईंदर पुर्व यास ताब्यात घेवून अभिलेख पडताळी केली असता सदर इसम हा मा. पोलीस उप आयुक्त, मिरा-भाईदर, परीमंडळ क्र.०१ यांचे कार्यालयीन जावक क्रमांक पो.उपआ.परी.-१/वाचक/हद्दपार आदेश- सुदर्शन खंदारे/३४८३/२०२३, हददपार आदेश क्र. ०६ /२०२३ अन्वये दिनांक ०१/०७/२०२३ चे आदेशा प्रमाणे ठाणे जिल्हा, पालघर जिल्हा, मुंबई शहर, मुंबई उपनगरे या जिल्हा कार्यक्षेत्रातुन तडीपार करण्यात आले असल्याचे निष्पन्न झाले आहे. तरी नमुद इसम हा तडीपार असतांना देखील तो आदर्श इंदिरा नगर, भाईंदर पुर्व येथे मिळुन आला म्हणुन त्याचे विरुध्द महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ प्रमाणे माझी सरकार तर्फे कायदेशिर फिर्याद पोहवा/०४००९, संग्रामसिंह दिलीप गायकवाड, नेम. मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा, यांनी दिली असुन सदर प्रमाणे नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर १२/२०२४, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ प्रमाणे दिनांक ०५/०१/२०२४ रोजी दाखल करण्यात आली आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), व श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.नि. राहुल राख, पोउपनिरी/ हितेंद्र विचारे, स.पो.उप.निरी. श्रीमंत जेधे,पोहवा/मनोहर तावरे, पोहवा/संग्राम गायकवाड, पोहवा/राजवीर संधु, पोहवा/हनुमंत सुर्यवंशी यांनी केली आहे.

-----------oooooooo----------